नि.फौ.ख.क्र.७९२/२०२१
शासन –वि– अरुण
नि.क्र.५१

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – महादेव चंद्रभानजी कडू,
वय अंदाजे ४० वर्ष, कामधंदा– शेती,
राहणार– टाकळी चना, ता.जि.वर्धा

..........................................................................................................................

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची सरतपासणी– सरकारी वकील श्रीमती ज्योती लकडे यांच्या मार्फत.**

१. मी आरोपींना ओळखतो. मी फिर्यादीला देखील ओळखतो. मी कामाला चाललो होतो, त्यावेळी फिर्यादी व आरोपींमध्ये बोलचाल होती. त्याव्यतिरिक् मला काहीही माहीत नाही.

साक्षीदार हा त्याच्या पहिल्या बयाणास मुकारला असता, सरकारी वकीलांनी उलट तपासणीच्या स्वरुपात उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.

२. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व आरोपींचे घर जवळजवळ आहे व त्यांच्या घरासमोर एक रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की घटना दिनांक १०.०९.२०२१ रोजी घडली. हे म्हणणे खरे नाही की त्या दिवशी कचरा कोणी फेकला या कारणावरुन आरोपी व फिर्यादीमध्ये माझे समक्ष भांडण सुरु होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की बोलचाल सुरु होती. हे मला माहीत नाही की आरोपी क्र.२ ही विळा घेवून आली आणि फिर्यादीच्या उजव्या पायाच्या पोटरीखाली विळयाने मारले.

३. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व आरोपी क्र.१ हे चुलतभाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की मला त्यांच्या भानगडीत पडायचे नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.यु.जी. काशिकर यांच्याव्दारे**

४. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व फिर्यादीच्या घराशेजारी श्री.विलास होले, श्री.गंगाधर कडू व श्री.गोपाल होले, श्री.दिलीप उगेमुगे यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या वेळी हे इसम घटनास्थळी हजर होते. हे म्हणणे खरे आहे की त्यांच्या घरासमोरील रस्ता हा रहदारीचा असून तिथे सतत लोकांची ये–जा सुरु असते. हे म्हणणे खरे

आहे की घटनेच्या दिवशी मी घटनास्थळाच्या समोरील घरात काम करीत असल्यामुळे दिवसभर तिथेच हजर होतो.

आरोपींतर्फे उलटतपास पूर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.09.16 11:56:35 +0530

(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक १५–०९–२०२५

माझे समक्ष

GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.09.16 11:56:39 +0530

(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक १५–०९–२०२५